# कला व वाणिज्य

# महाविद्यालय, वडूज

काळे कल्पेश विकास

विषय :- व्यावसायिक पर्यावरण

हजेरी क्र :- १६५

मार्गदर्शक :- खोत सर

बी.कॉम भाग - ३

सेमिस्टर - 6 2019-20

Scanned with CamScanner

Page No.
Date

प्र। बाराव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्ट्ये स्पष्ट करा?

भारत सरकारने 12 व्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार केला. त्यानुसार या योजनेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल.

① **सर्व समावेशक वृद्धी दर :-**

बाराव्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य असा आधार वेगवान शाश्वत व सर्व समावेशक वृद्धीदर हा आहे. या योजनेसाठी सरासरी वृद्धीदर हा 9.5% इतका निश्चित करण्यात आला. 10 व्या पंचवार्षिक योजनेचा उद्दिष्टे हे साध्य झालेले नव्हते. ते साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेत करण्यात आला.

② **दारिद्र्य निर्मूलन :-**

सरकारने या योजनेत 10% दारिद्र्य कमी करण्याचे लक्ष निर्धारित केले आहे. सन 2009-2010 च्या अखेरीस भारतात एकूण लोकसंख्येच्या 29.8% लोकसंख्या ही दारिद्र्य रेषेखाली होती. ते प्रमाण कमी करण्यासाठी नियोजन मंडळाने प्रयत्न केले होते.

③ **आरोग्य सोयीत सुधारणा :-**

या योजनेत आरोग्याच्या बाबतीत विशेष असे प्रयत्न करण्यात आले. तसेच सार्वजनिक आरोग्याला विशेष दर्जा प्राप्त करून देण्यासाठी काही योजना आखण्यात आल्या. त्यामध्ये बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे, माता मृत्यूचे प्रमाण कमी करणे, सर्वांसाठी शुद्ध व स्वच्छ पाणी पिण्यास देणे- इ. योजना आखण्यात आल्या.

④

Scanned with CamScanner

Page No.
Date

④ शेती विकास व ग्रामीण उत्पादनात वाढ:-

शेती अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतातील एकूण क्षेत्रफळापैकी फक्त 1403 दशलक्ष हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. भारतातील बहुसंख्य लोकांची उपजीविका ही शेती व्यवसायावर अवलंबून आहे. यासाठी या योजनेमध्ये पीक विमा योजना जमिन सुधार कार्यक्रम राबविण्यात आले.

⑤ वृद्धी विरोधी चलनवाढ:-

11 व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी अर्थव्यवस्थेत चलनवाढीचा दबाव निर्माण झाला. यासाठी या योजनेमध्ये सरासरी वृद्धीदर 9% पर्यंत साध्य करण्यासाठी स्थूल देशांतर्गत उत्पादन 38.5% वाढविले पाहिजे असे आल्यास प्रतीवर्षी सरासरी 5% दराने भाववाढ घडून येईल आणि चलनवाढीची स्थिती संपुष्टात येईल.

⑥ खाजगी क्षेत्राची भागीदारी:-

या योजनेत पायाभूत प्रकल्प तसेच बांधकाम विभाग खाजगी क्षेत्र यांची सरकारशी असणारी भागीदारी वाढविली जाईल असे निश्चित करण्यात आले. त्यामुळे पायाभूत प्रकल्प पूर्ण करण्यास मिळणारा पैसा वाढून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कमी कालावधी लागतो.

⑦ औद्योगिक धोरणाचा नवीन नमुना:-

11 व्या पंचवार्षिक योजनेत कारखानदारीच्या उत्पादन वाढीचे लक्ष 10% होते. परंतु प्रत्यक्षात हे लक्ष 7.7% एवढेच पूर्ण करता आले. तसेच 11 व्या योजनेमध्ये उद्योग क्षेत्राविषयी आखलेल्या योजना पूर्ण केल्या नाहीत. यासाठी 12 व्या पंचवार्षिक योजनेकडे कारखानदारी क्षेत्रावर अधिक लक्ष

Scanned with CamScanner

केंद्रित करून सरकारची सार्वजनिक क्षेत्राकडे गुंतवणूक कमी करण्यावर भर देण्यात आला,

8) **बचत व गुंतवणूकीत वाढ घडवून आणणे:-**

12 व्या योजनेत 9% वृद्धीदर साध्य करण्यासाठी बचत व गुंतवणूकीत योग्य प्रमाण राखून व्यवहार तोलातील चालू खात्यातून होणारी तूट कमी करण्यातील उपाययोजनेत त्याचबरोबर देशातील बचतीमधून भांडवल निर्मिती वाढेल अशा धोरणांची अंमलबजावणी केली जाईल. तसेच ग्रामीण बचतीचे एकत्रिकरण करण्यासाठी बचत गटाचे धोरण ठरविण्यात आले.

थोडक्यात 12 वी पंचवार्षिक योजना ही सर्वस्पर्शी व शाश्वत विकासासाठी आहे. आणि तो विकास 2017-18 या कालावधीत या उपरोक्त उद्दिष्टांमार्फत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अशाप्रकारे बाराव्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे स्पष्ट करता येतात.

Scanned with CamScanner